# 'नसानसातून' : एक रूपवेध

– डॉ. बाळकृष्णजी कानोळकर

'**नसानसातून**' ही कवी अवधूत कुडतरकर यांची कविता. कवी कुतरकर हे गोमंतकीय साहित्यिक जगताला सुपरिचित असलेले एक नाव. साहित्याचे अनेक प्रकार त्यांनी यशस्वीपणे हाताळलेले आहेत. त्यात कवितेच्या बरोबरीनेच कादंबरी, बालसाहित्य, इत्यादी साहित्य प्रकारांचा देखील समावेशच वाट मोकळी करून देत असताना होतो. मराठी भाषेद्वारे आपली प्रज्ञा आणि प्रतिभेला कोंकणीमधूनही त्यांनी सकस लेखन केलेले आहे. अर्थात ते बहुभाषिक लेखक आहेत. कोणत्या तरी एका भाषेच्या पिंजऱ्यात अडकून पडणारे ते प्रतिभावंत नाहीत. गोमंतकात हे उदाहरण पहिलेच नाही. यापुर्वीचे बोरकर–रामाणी हे कविद्वय आणि प्रा. लक्ष्मणराव सरदेसाई हे सिद्धहस्त कथाकार यांची नावे यासंदर्भात सांगता येतील. आजही त्यांचा हा वारसा काही तरूण प्रतिभावंत आपापल्या परीने पुढे चालविताना दृष्टीस पडतात.

कवी कुडतरकर हे मान्यताप्राप्त कवी आहेत. यापुर्वी '**रंभागर्भ**' आणि '**हिमनग**' असे त्यांचे काव्यसंग्रह प्रसिद्ध झालेले असून त्यांना कवी म्हणून लोकमान्यता आणि राजमान्यताही प्राप्त झालेली आहे. खरे तर '**रंभागर्भ**'ची कविता पुढे त्यांचे एकुणच काव्यविश्व व्यापून राहिलेली आहे असे वाटते. याचा अर्थ पुढे त्यांच्या कवितेचा विकास खुंटला असा मात्र नव्हे.

त्यांची '**नसानसातून**' ही कविता काहीशी गूढ स्वरूपाची असल्याचा भास होतो. या कवितेला मिळालेला हा खास कुडतरकरी टच. कवी कुडतरकरांच्या बहुतेक कवितांना तो लाभलेला आहे. आणि म्हणूनच त्यांची कोणतीही कविता स्वत:ची Identity घेऊनच अवतरते. मर्ढेकर- ग्रेस प्रभृतींची कविता वाचूनच तिच्या कर्त्याचा बोध जसा स्वभाविकपणेच होतो तसाच प्रकार या गोमंतकीय कवीच्या कवितेच्या बाबतीत अनुभवावयास मिळतो. खरे तर कवी म्हणून त्यांना मिळालेली ही सिद्धीच म्हणावी लागेल.

'**नसानसातून**' ही कविता वाचताना वाचकाला अनेक चकव्यांना सामोरे जावे लागत असावे, असे वाटते. आणि अशा एखाद्या चकव्यात सापडल्यार तिच्या आकलनाला -यथार्थ आकलनाला – मुकावे लागणे संभवनीय आहे. वरवर पाहू जाता ही एक आध्यात्मिक कविता असल्यासारखे वाटते. परंतु ती तशी नाही. तिची शब्दकळा अध्यात्म्याच्या जातीला जवळची असल्यामुळे हा चकवा बसतो. कविला जे सांगायचे असते ते सरळ सांगण्यात काव्य असत नाही. वक्रोक्ती, सूचकता हेच कलेचे आणि म्हणूनच कवितेचेही मर्म आहे.

कवी जे सांगत असतो त्याहीपलीकडचे तो सूचवित असतो. आणि या सूचनाव्यापारात तो यशस्वी ठरला तरच तो कवी. नपेक्षा त्याला कवडा म्हणावे. कवी कुडतरकर हे जातिवंत, स्वयंसिद्ध कवी आहेत. ते शब्दातून जे सांगतात त्याही पलीकडचे ते सहजपणे सूचवून जातात. हे सूचविणे इतके तरल असते की वाचकाला, रसिकाला, अभ्यासकाला ते तितक्याच तरलतेने आणि अलवारपणे मनाच्या कानात पकडावे लागते. ते अरूपाचे रूप असते. पारा हातात धरण्याचा तो एक प्रयत्न असतो, पाण्याने पाणी बांधून आणण्यासारखा. 'नसानसातून' जे काही भिनलेले असते ते काय आहे याचे निश्चित आकलन कविला होऊ शकत नाही आणि म्हणूनच ते तो स्पष्टपणे सांगूही शकत नाही. तें जें 'काही' असतें तें शब्दातीत असतें. कवी त्याला शब्दरूप देण्याचा प्रयत्न करतो. खरे तर ते स्वत:च शब्दरूप घेऊन अवतरते. कवी केवळ निमित्त मात्र असतो.

'नसानसातून' या कवितेच्या प्रथम वाचनातच मला केशवसूतांच्या 'क्षणात नाहीसे होणारे दीव्य भास' या कवितेची आठवण झाली. कुडतरकरांची ही कविता केशवसूतांच्या या कवितेच्याच जातूकुळीतली आहे या विषयी माझ्या मनात यत्किंचित देखील शंका नाही.

नवनिर्मितिसंबंधीच्या, नवसृजनाविषयींच्या वेदनांना उद्‌गार देणारी ही कविता कवीने चार–चार पदबंधांच्या चार कडव्यातून मांडलेली आहे. मी लिहीलेली आहे असे म्हणत नाही. 'मांडलेली आहे' हे माझे म्हणणे ध्यानात घ्यावे. ही चार कडवी म्हणजे काव्यानुभूतीच्या प्रवासातले चार सोपान. या सोपानांवरून कवीच्या प्रतिभेचा प्रवास होताना दिसतो. चारही कडव्यामधून जाणवत रहाते ते हे की, प्रत्येक कडव्यात कवीमधील सर्जक सृजनाच्या एका वेगळ्याच सोपानावर उभा आहे. अध्यात्माचा भुकेलाही या चार सोपानावरूनच प्रवास करीत असतो. साधक–शंकीत–सिद्ध आणि पुन्हा शंकीत. इथेच या कवितेला एक अध्यात्मिक आयाम प्राप्त होण्याची शक्यता निर्माण होते.

कलावंत हा रसलंपट असावा लागतो. आणि बहुधा तो तसा जन्मजात असतो. तीच त्याची कवच–कुंडले असतात. ती घेऊनच तो जन्मतो. डोळ्यांची पापणी देखील टोचावी असे संवेदनशील मन घेऊनच तो जन्मतो तेव्हाच कुठे जीवनात येणारे अनेकविध जीवनानुभव 'नसानसातून' भिनतात. असे हे 'काही' नसानसातून भिनल्याविना, त्याच्याशी नाते जडणे नाही. आणि असे नाते जडल्यावर 'आयुष्याची अनावर ओढ' लागून राहते. तीच कला होऊन अवतरते. तीच 'शब्दावाचून गाते' कवीने केलेली ही शब्दयोजना इथे ध्यानात घ्यावी लागेल. कोणत्याही सृजनाला मूर्तरूप खरे तर नसतेच. कारण ते मुळात अमूर्तच असते.

केवळ सोय म्हणून कलावतं त्याला रंग–रेषा–आकार–उकार–हुंकार ह्यांमध्यें बंदिस्त करण्याचा प्रयत्न करीत असतो. असा प्रयत्न तो करतो तो स्वत:साठी नव्हे, तर दुसऱ्यांसाठी. स्वत: ला ज्या दीव्यत्वाचा दीव्य भास झाला, साक्षात्कार झाला त्याचा थोडासा प्रकाश, थोडासा सुंगध, थोडासा दरवळ, थोडासा रंग आपल्या अवतिभवतीच्या सहधर्मियांना, जन–लोकांनाही मिळावा हाच त्यामागे हेतू असतो. आणि हेच कलेचे परमोच्च प्रयोजन. कला स्वान्त सुखाय असतेच परंतु ती पर दु:खायही नसते, हे ध्यानात घेतले पाहिजे.

कवी होण्याकरिता व्यासंग करावा लागतो, व्युत्पन्नताही असावी लागते असे सांगितले जाते. परंतु मुळात प्रतिभाच नसेल तर कसचे काय ? म्हणूनच कवी म्हणतो,

**नव्हती ओळख नव्हते काही**
**रेषा नव्हत्या जुळल्या**

असं असूनही कवितेचा जन्म होतो. कुठून ? '**व्यथा पुन्हा कोसळल्या**' या पदबंधातून कवीने स्वत:च याचे उत्तर देऊन ठेवलेले आहे. 'व्यथा घडविते कथा' असे म्हटले जाते. क्रोंचवधाच्या व्यथेतून 'रामायणा' चा जन्म झाला हे सर्वश्रूतच आहे. ही 'व्यथा'च कोणत्याही कलेची जननी आहे. कविताही याला अपवाद असू शकत नाही. ही व्यथा, सह–अनुभूतीची संसंवेदना कवीला इतरेतर मनुष्यप्राण्यापासून वेगळी काढते. त्याच्या अंगी असे 'काही' नसानसातून भिनण्याची क्षमता निर्माण करते. त्याला कवी बनविते, आणि या 'व्यथा' कशा ? तर पुन्ह: पुन्हा 'कोसळणाऱ्या'. कवी म्हणतो,

**पाऊस होऊन चिंब सरींचा**
**व्यथा पुन्हा कोसळल्या**

या पदबंधातील 'व्यथा' या शब्दाचे साहचर्य अभ्यासण्यासारखे आहे. 'व्यथा' हा एकच एक शब्द पाऊस, चिंब, सरी, पुन्हा, कोसळ्या अशा अनेकानेक शब्दांशी एकाच वेळी जोडला गेल्याने अर्थाची अनेकविध वलये निर्माण करून 'सृजनकळे'ची संवेदना रूपबद्ध करण्यात कवी कमालीचा यशस्वी झालेला आहे असे म्हणावे लागेल. उदा. (अधोरेखित शब्द अभ्यावेत):

**पाऊस होऊन येणारी व्यथा**
**चिंब भिजविणारी व्यथा**
**सरी सारखी येणारी व्यथा**
**चिंब सरींचा पाऊस होऊन येणारी व्यथा**

**कोसळणारी व्यथा**

**पुन्हा कोसळणारी व्यथा**

**पुन्ह: पुन्हा कोसळणारी व्यथा**

**चिंब सरींचा पाऊस होऊन पुन्ह: पुन्हा कोसळणारी व्यथा**

'व्यथेची' अशी नानाविध रूपे, नानाविध आर्त, विविधांगी स्पर्श, चेतनाचेतनाच्या विविध पातळ्यांवरून जागविली जाणारी संवेदना, सह–अनुभूती कवी या दोन ओळीतून–केवळ सात शब्दांमधून सुचवून जातो. कवितेचे समर्थ ते हे.

'कोसळणारी' असल्यामुळे ही व्यथा रौद्र भीषण जरूर आहे परंतु ती सरींचा चिंब पाऊस होऊन आलेली आहे. 'सरीचा चिंब पाऊस' ही प्रतिमाच इतकी बोलकी आहे की त्यावर वेगळे भाष्य करण्याची आवश्यकता भासू नये. इथे कवी बोरकरांची 'सरींवरी सरी' ही कविता आठवण देऊन जाते.

या कवितेतली 'पाऊस' ही प्रतिमाच मुळी प्रतिभेविषयी भाष्य करते. 'प्रतिभा' म्हणजे काय ?आणि तिचा साक्षात्कार होतो म्हणजे काय होते? याचे उत्तर कवी इथे सहजपणे देऊन जातो. एखादी व्यक्ती 'पावसात चिंब भिजावी' तसा कवी 'प्रतिभे'च्या पावसात चिंब भिजत असतो. हा पाऊस जसा दैवी तशी प्रतिभाही देवदत्त. ती दैवानेच लाभते. त्यात चिंब भिजणारे तेची पुरूष दैवाचे. 'पाऊस' पडल्याविना नव्याचे सृजन होत नाही. धरणीला, या मातीला कोंभ फुटत नाही. तद्वत प्रतिभेच्या पावसात चिंब न्हाऊन निघाल्याशिवाय कवीच्या वेदनेचा वेलु गगनावेरू चढत नाही. कलावंताची कला, कविची कविता हे दुसरे तिसरे काही नसून शृंगाराचे मोहक रूपडे घालून अवतरलेली, अंकुरलेली वेदनाच असते; असेच कविला सूचवावयाचे आहे; असे वाटते. 'सरींचा चिंब पाऊस' किंवा 'पावसाच्या सरी' या प्रतिमेतून कवीने कला आणि शृंगार यांचा अन्योन्यसंबंध सूचविलेला आहे.

**पुन्हा एकदा ओठावरती**

**स्तोत्रे असली जुळली.**

**'पाऊस होऊन चिंब सरींचा \ व्यथा पुन्हा कोसळल्या'** नंतर पुन्हा एकदा ओठावरती स्तोत्रे असली जुळली, असे कवी म्हणतो. या ओळीतील 'पुन्हा एकदा' या क्रियाविशेषणातून कृतीचे गाण्याचे आवर्तन, अखंड आवर्तन सूचविलेले आहे. या आवर्तनात 'कोसळणाऱ्या व्यथा' स्तोत्र बनून येतात. या कवितेतली ही 'स्तोत्रे' 'उष:सुक्ते' नसून ती 'व्यथासुक्ते' आहेत. 'असली' या विशेषणातून त्यांचा परिचय करून दिला जातो. परंतु 'असली' या

विशेषणातून निश्चित रूपनिश्चिती केली जात नाही. त्यांचे रूप काहीसे अनिश्चित, संदिग्धच राहते. ते अस्पष्ट धुक्यात हरवल्यासारखे वाटते. तरीही 'असली'चा रोख 'कोसळणाऱ्या व्यथा' कडे आहे हे लपून राहात नाही. ही 'स्तोत्रे' स्फुरत नाहीत तर 'जुळतात'. तीही 'ओठावर'. ओठावर ओठ जुळल्यासारखी. त्यातून 'व्यथां' विषयीची ओढ, आसक्ती, अनुरक्ती सूचित केली जाते.

मात्र अशी ही स्तोत्रे ओठावर जुळण्याच्या समयी कवी म्हणतो,

**आत कुठेशी सांज अनोखी**
**अनंग रंगी झाली.**

व्यथांचे गाणे गाता गाता आत, अंतर्यामी, अनोखी अनंग रंगी सांज होत येते. पण 'आत' म्हणजे 'अंतर्यामी' असे निश्चितपणे म्हणता येणार नाही. कविलाही ते निश्चितपणे सांगता आलेले आहे. सांगता येत नाही. म्हणूनच तो त्यासाठी 'कुठेशी' असा शब्दप्रयोग करतो, ज्यातून नक्की कुठे याचा बोध होत नाही. 'आत' एवढे कळते पण 'आत'च्या कोणत्या भागात ते अनुतरीत राहते. या अनुत्तरीत राहण्यातच या 'सांजे'ची धुसरता, तरलता, आर्तता, गुढता, विव्हलता दडलेली आहे. आणि म्हणूनच ही 'सांज' इतर 'सांजां' सारखी ओळखीची न वाटता ती 'अनोखी' वाटते. ती ओळखीची असूनही तिची ओळख पटत नाही. कळते पण वळत नाही. या 'सांजे'मधून 'विराणीचे', भैरवीचे स्वर ऐकू येऊ लागतात. प्रतिभेचा दीव्य साक्षात्कार आता ओसरू लागल्याची जाणीव हळु–हळू होऊ लागते. '**सांज अनंग रंगी झाली**' या पदबंधातून सर्वस्वाचा निरोप सूचित होताना जाणवतो. पण या सर्वस्वाच्या निरोपामध्ये सर्वस्वाचे समर्पणही अभिप्रेत आहे. या समर्पणामुळेच ही सांज 'अनंग रंगी' होते. या पदबंधातला 'अनंग' हा शब्द 'अचपळ' या शब्दाच्या जातकुळीतला आहे. 'अचपळ' म्हणजे अति चपळ तसाच 'अनंग' म्हणजे सर्वस्वी, संपूर्ण नागडा. सर्व प्रकारची जाणीव नेणीव जिथे गळून पडते अशी स्थिती म्हणजे 'अनंग'. सृजनसमयी सर्जक जाणिवेच्या–नेणिवेच्या पलीकडे पोहचलेला असतो. तो देहभान हरपून गेलेला असतो. सर्व बंधाच्या पलिकडला असा तो बंधमुक्त होतो. म्हणजेच पूर्ण अनंग होतो. या 'अनंगा'च्या 'रंगी' म्हणजे बेहोषीत तो बुडून जातो. कोणत्याही कलेचा जन्म अशा बेहोषितच होत असतो. 'ब्रस्मानंद सहोदर स्थिती' किंवा 'केवल समाधी' असेही यास म्हटले जाते. 'युरेका' अवस्था ती हीच

अशा स्थितीत देहाची समाधी लागते आणि नसातून युगे भिनतान. काळाचे भानही

हरपले जाते आणि सत्याचा, शिवाचा, सुंदराचा साक्षात्कार होतो. परंतु अशी उद्‌गार पावलेली कविता खरी तर पूर्ण असूच शकत नाही. ती अर्धीच असते. कोणतीही कलाकृती, कोणतीही सौंदर्यकृती ही संपूर्ण असणे शक्यच नसते कारण ती अंतिम असत नाही. कारण सत्याच्या शोधयात्रेच्या मार्गावरचे ते एक पेणे असते, तो एक पडाव असतो. यात्रा अर्धी राहते, अपूर्ण राहते परंतु तिथवर केलेली वाटचाल पूर्णच असते. ती अपूर्ण असूच शकत नाही. यात्रा संपली हे असत्य. परंतु वाटचाल संपली हे सत्य. प्रत्येक कलाकर हा या सौंदर्ययात्रेतील या सत्यशोधनातील या अंतिम श्रेयसाच्या प्राप्तितील एक कडी असतो. या यात्रेत त्याला आलेला अनुभव हा त्याच्या पुरता सत्य असतो, पूर्ण असतो. आणि म्हणून त्याने मुखरित केलेल्या शब्दसृष्टीतील जगे, विश्वे म्हणजेच त्याची भावविश्वे ही पूर्णच असतात. एका अपूर्णाकडून घेतलेला हा पूर्णाचा शोध असतो. ही यात्रा युगानुयुगे अव्याहत अशीच पुढे पुढे अखंड चाललेली आहे. तिला अंत नाही. म्हणूनच कायमच्या अर्ध्या राहण्याऱ्या कवितेला आणि तिच्यातील पूर्ण जगांनाही अंत नाही. म्हणूनच कवितेच्या भरतवाक्यात कवी म्हणतो,

**कायमची ही कविता अर्धी**
**पुर्ण त्यातली जगे**

मर्ढेकरांनीही म्हटलेले आहे, 'अब्द अब्द मनी येते'.परंतु सारेच शब्दात पकडता येत नाही. त्यातून बरेचसे सुटते. आणि जे काही थोडेसे हातात राहाते तेच कविता होऊन अवतरते या विचारालाच कुडतरकरांनी या कवितेतून काव्यरूप दिलेले आहे.

काव्यप्रतिमा, शब्दाकळा आणि शब्दार्थादी अलंकारांच्या दृष्टीनेही ही कविता अभ्यासनीय आहे. या कवितेच्या रचनेत तिच्या शब्दशिल्पातले एक सौष्ठव तर आहेच परंतु एक नादाकारही जाणवत राहातो. तिचा शिल्पाकार जसा नेत्रसुखद आहे तसाच तिच्यातून उठणारा नादाकार श्रुतिसुभग आहे. त्यामुळे कवितेला गेय स्वरूप प्राप्त झालेले आहे. ही गेयता कवीने अनुप्रास–यमकादी अलंकारांच्या प्रमाणबद्ध आवर्तनातून साधलेली आहे. प्रत्येक कडव्यात लहान लहान चार–चार पदबंधांची योजना करून त्यातील दर दुसऱ्या आणि चौथ्या बंधावर अंत्ययमक साधलेले आहे. पहिल्या दोन कडव्यातून पहिली ओळ अंत्ययमकाने साधली गेली असून दुसरी ओळ उघडी (open) सोडलेली आहे. तिसऱ्या व चौथ्या कडव्यामध्ये दुसऱ्या व तिसऱ्या पदबंधातूनही अंत्ययमक साधलेले आहे. 'भिनले', 'जडले' / 'रेषा' / 'जुळल्या', 'कोसळल्या', आशा अंतर्गत शाब्दयमकांचाही वापर कवीने

खुबीने केलेला आहे. अनुप्रास आणि वर्णावर्तन यामुळेही रचनेला लावण्य आणि गती प्राप्त झालेली आहे. उदा,

**नसानसातून भिनले काही**
**नकळत जडले नाते**

या ओळीतील 'न' या वर्णाची आवर्तने आणि 'अ, आ, इ, ए' या वर्णातून साधलेला सुमधूर अनुप्रास परिणामात भर टाकणारा आहे.

'चिंब सरींचा पाऊस होऊन कोसळणाऱ्या व्यथा' 'अनंग रंगी अनोखी सांज', 'अर्ध्या कवितेतील पूर्ण जगे' या प्रतिमा आशयघन आहेत. आणि औचित्यपूर्णही आहेत. एकाच वेळी विविध संवेदना जागविण्याचे सामर्थ्य त्यांच्या ठायी आहे. उदा. 'चिंब सरींचा पाऊस' या प्रतिमेतून दृकश्राव्यस्पर्शादी संवेदना एकाचवेळी झंकारीत होतात. इतकेच नव्हे तर अंतर्यामीच्या सहाव्या इंद्रियाला, अंत:स्करणाला जागविणारी ही प्रतिमा आहे.'अनंग रंगी अनोखी सांज' ही प्रतिमा एकाच वेळी भौतिक आणि आधिभौतिक पातळीवर रसिकाला भोवंडून आणते. भावनेची तार छेडता छेडता अंतमुर्ख बनविण्याचे अनोखे सामर्थ या प्रतिमेत निश्चितच आहे. 'अर्ध्या कवितेतील पुर्ण जगे' ही प्रतिमा याची देहीं याची डोळां आधिभौतिकाचा, अध्यात्माचा साक्षात्कार घडविणारी आहे. या अशा प्रतिमांच्या योजनेमुळेच कुडतरकरांची ही कविता '**दिगंबरा**' पंथातील '**शक्तिपाता**'ची दीक्षा देणारी कविता वाटते. परंतु हा ही एक चकवाच म्हणावा लागेल. त्यांची ही नितांत सुंदर कविता म्हणजे एक 'सृजनसोहळा'च आहे असेच मला तरी राहून राहून वाटत राहते.

❖ ❖ ❖

**तमाम लेखकांना कळकळीचे आवाहन:**

भारतीय साहित्याचे शिल्पकार कै. (प्रा.) लक्ष्मणराव सरदेसाई यांचे हे जन्मशताब्दी वर्ष. त्यानिमित्ताने '**अपरांतक**'चा मार्च २००४चा अंक '**लक्ष्मणराव सरदेसाई विशेषांक**' म्हणून काढण्याचा संकल्प केला आहे. तरी **कोंकणी** व **मराठी** लेखकांनी त्यांच्याविषयींचे, त्यांच्या साहित्याविषयींचे लेखन– आठवणी, समीक्षा, शोधनिबंध आमच्याकडे पाठवून आम्हास सहकार्य करावे ही विनंती. पसंत साहित्यास योग्य ती प्रसिद्धी आणि शक्त्यनुसार तो मोबदला दिला जाईलच.

साहित्य उशिरात उशिरा **२९ फेब्रुवारी २००४**पर्यंत पोचेल असें पाठवावे.

आपले सहकार्य अपेक्षित आहे. **– संपादक**